दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २८५ वा ▶ गुरुवार दि. १० ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## आधी सरकार पाडण्याची सुरुवात पवारांनी केली; शहा



**दिल्ली ।** महाराष्ट्रात सर्वात आधी सरकार शरद पवार यांनी पाडले, असे म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेच्या अधिवेशनात इतिहासाची आठवण करून देत राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. दरम्यान संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी केंद्रातील मोदी सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. या प्रस्तावावर ८-१० ऑगस्टदरम्यान चर्चा होणार आहे. या प्रस्तावावर काँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी चर्चा सुरू केली.

# धुळ्यात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला मोठा धक्का

## माजी आमदार अनिल गोटे यांचा पक्षाला राम राम

**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे, माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपप्रदेश अध्यक्ष अनिल गोटे यांनी राष्ट्रवादीला पुनश्च हरिओम म्हणत राम राम ठोकला आहे. पक्षाच्या अंतर्गत गटबाजीला कंटाळून पक्षश्रेष्ठींकडे आपला राजीनामा सोपविला असून सध्यातरी कुठल्याही पक्षात जाणार नसल्याचे गोटे यांनी स्पष्ट केले आहे.

माजी आमदार अनिल गोटे यांनी आज धुळ्यात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अनिल गोटे यांची गेल्या काही काळापासून पक्षांतर्गत असलेल्या गटबाजीमुळे त्यांची घुसमट होत होती. यापूर्वी देखील गोटे यांनी वेळोवेळी पक्षश्रेष्ठींच्या जाहीर कार्यक्रमात देखील पक्षांतर्गत होत असलेल्या गटबाजीबाबत उघड उघड नाराजी व्यक्त केली होती. आपल्या मनात कोणाबद्दलही कटूता किंवा नाराजी नाही. राष्ट्रवादी काँग्रेसला चांगले दिवस प्राप्त व्हावेत, हीच सदिच्छा आहे. मात्र, पक्ष सोडला तरी शरदचंद्र पवारांची साथ सोडणार नाही, असे सांगतानाच अनिल गोटे यांनी पुनःश्च जय'लोकसंग्राम'चा नारा दिला आहे. अनिल गोटे यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस भवनातील आपल्या सामानाची आवराआवर केल्यानंतर काल अजितदादा पवार व शरदचंद्र पवार या दोन्ही गटांनी राष्ट्रवादी भवनावर आपला दावा सांगितला. दोन्ही गटांमध्ये तीव्र बाचाबाची झाली. शेवटी दोघांनी भवनाला 'टाळे' ठोकले. शिवाय अनिल गोटेंनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यापासूनच राष्ट्रवादीत गटबाजीला ऊत आला होता. या पार्श्वभूमीवर अनिल गोटे यांनी पत्रपरिषद घेवून आपली भूमिका स्पष्ट केली. यासाठी त्यांनी शहरातील गुलमोहर विश्रामगृहात पत्रपरिषदेचे आयोजन केले होते. कार्यकर्ते ही राष्ट्रवादीत येण्यास यावेळी अनिल गोटे म्हणाले की, भाजपामधील गटबाजी, गुंडांना खुलेआम समर्थन व संरक्षण तसेच प्रोत्साहन देण्याच्या मनोवृत्तीस कंटाळून आपण मुदतपूर्व विधानसभा सदस्यत्वाचा व पक्षाचा राजीनामा देवून बाहेर पडलो. राष्ट्रवादीत स्वच्छेने प्रवेश घेतला. सलग चार वर्षे शरद पवारांचे नेतृत्व स्वीकारन माझ्यासह लोकसंग्राम मधील अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादीत सहभागी झाले. अर्थात काही कार्यकर्त्यांना माझा हा निर्णय मान्य नव्हता परंतु, तरीदेखील ते माझ्यासोबत पक्षात कार्यरत झाले.

**पक्षाचे संघटन वाढविले!**

अनिल गोटे पुढे म्हणाले की, धुळे जिल्ह्यात राष्ट्रवादीला चांगले दिवस यावेत, यासाठी धुळे, शिंदखेडा, साक्री तालुक्यात १०८ ठिकाणी शिवार बैठका घेतल्या. गरीब कष्टकर्यांना न्याय मिळावा, यासाठी नवीन शाखांची निर्मिती तसेच पक्षाच्या फलक अनावरणाचे कार्यक्रम आयोजित केले. परंतु, कोविड महामारीमुळे शरद पवारांच्या आदेशाने शिवार बैठका थांबविल्या. त्यामुळे पक्ष उभारणीच्या कामाला खीळ बसली, ती कायमचीच. दरम्यान, शिंदखेड्याचे आमदार जयकुमार रावल यांच्या अवास्तव प्रशासकीय हस्तक्षेपाने दोंडाईचा, शिंदखेडा मतदार संघातील जनता त्रस्त झाली होती. रावल पिडीत लोक मला येवून सातत्याने भेटत होते. 'तुम्हीच काहीतरी करा' म्हणून पदोपदी सांगत होते. त्यामुळे दहशतवादमुक्त शिंदखेडा ही भूमिका घेवून दि.१७ फेब्रुवारी रोजी शरद पवारांच्या मेळाव्याचे आयोजन केले. तथापि, कोविडमुळे हा कार्यक्रमही रद्द झाला.



**गटबाजीला कंटाळलो!**

पक्षातील गटबाजी थाबवून पक्ष संघ ठेवण्याच्या प्रयत्नास यश न आल्याने तसेच पक्षातून बाहेर पडलो तर पक्ष नेतृत्व गटा-तटाचे राजकारण संपुष्टात आणू शकेल. या विचारातून मी व माझ्या सहकार्यांनी राष्ट्रवादी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत वरिष्ठ नेतृत्वास देखील कळविले आहे. गटबाजीत वेळेचा अपव्यय करण्यापेक्षा आपण आपल्या वेळेचा सदुपयोग धुळेकर जनतेच्या रस्ता, पाणी, सार्वजनिक स्वच्छता या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी करु, असेही अनिल गोटे शेवटी म्हणाले.

**गटबाजीमुळे सोडला पक्ष**

पक्षांतर्गत गटबाजीला कंटाळून आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत असल्याचे म्हणत गोटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्षश्रेष्ठींकडे आपला राजीनामा सुपूर्द केला आहे. याबाबत पक्षप्रमुख शरद पवार यांना देखील याबाबतची कल्पना दिली असल्याचे गोटे यांनी स्पष्ट केले आहे.

## न्यूज कॉलम

### लग्नाचे आमिष दाखवून मुलीवर अत्याचार

**पिंपळनेर ।** होळ्याचापाडा (ता. साक्री) येथील अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर शेतातील घरात अत्याचार करणाऱ्या तरुणावर पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात करत संशयित आरोपीस ताब्यात घेण्यात आले. पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, राहुल रवींद्र ठाकरे (वय २२, रा. पुनाजीनगर, पो. टेंभे, प्र. वार्सा, ता. साक्री, ह.मु. पाटलीपाडा शिवार) याने त्यांच्या अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवत त्याच्या पाटलीपाडा शिवारातील शेतातील घरात नेले व तेथे तिच्यावर अत्याचार केला. पिंपळनेर पोलिस ठाण्यात राहुल ठाकरे याच्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

### चावी न दिल्याने चाकूने वार

**शिरपूर ।** दुचाकीची चावी न दिल्याच्या कारणावरून एकावर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना ७ ऑगस्टला सायंकाळी साडेसहाला लौकी (ता. शिरपूर) येथे घडली. नाना फुलसिंह बंजारा (वय ४१, रा. लौकी) असे जखमीचे नाव आहे. त्यांच्याकडे संशयित जयेश इंद्रसिंह राजपूत याने दुचाकीची चावी मागितली. ती देण्यास बंजारा यांनी नकार दिला. त्याचा राग आल्याने संशयिताने त्यांना घराजवळ बोलावून घेतले. हातातील चाकूने त्यांच्या पाठीवर वार केले. संशयिताविरोधात शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिस नाईक पी. पी. पाटील तपास करीत आहेत.

# शाहिरी काव्याने दुमदुमली धुळेनगरी

## अंगावर रोमांच आणणारे पोवाडे | नाट्य परिषदेने दिली सांस्कृतिक मेजवानी

**पुरुषोत्तम पाटील । धुळे**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शाहिरी काव्याच्या सादरीकरणाने धुळेनगरी दुमदुमली. गणरायाला नमन करून कलावंतांनी कार्यक्रमाला सुरुवात केली. मुंबई येथून आलेल्या दिग्गज कलावंतांनी अंगावर रोमांच आणणारे पोवाडे सादर केले. तसेच शाहीर अमर शेख यांचे नातू शाहीर निशांत शेख यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडं राहिली' ही छक्कड सादर करून उपस्थितांना ताल धरायला लावला. त्यांनी सादर केलेल्या पोवाड्याला रसिकांची भरभरून दाद मिळाली. याशिवाय कलावंतांनी लावणीनृत्य, लावणीगायन तसेच शाहीर साबळे यांची अजरामर गीते सादर करून वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे उदघाटन भारत सरकारच्या खेळ व युवा कार्यक्रम मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या नेहरू युवा केंद्र धुळे येथील जिल्हा युवा अधिकारी अशोककुमार मेघवाल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाटककार प्रा. अनिल सोनार होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मनोज गर्दे, युवा उद्योजक सारांश भावसार, लोकमंगल कलाविष्कार संस्थेचे अध्यक्ष विजय मंगळे, शाहीर श्रावण वाणी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य तथा जेष्ठ पत्रकार चंद्रशेखर पाटील यांनी केले होते. कार्यक्रमाची संकल्पना व संहिता प्रा. डॉ. प्रकाश खांडगे, चारुशीला साबळे वाच्छानी यांची होती. शाहीर निशांत शेख, शाहीर शंकर पिसाळ, नृत्यांगना वर्षा दर्पे, पूजा सावंत, शाहीर विजय कर्जावकर यांच्यासह लोककला क्षेत्रातील ३० मान्यवरांचा यात सहभाग होता. या कार्यक्रमासाठी नागरिकांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला होता.

यावेळी नेहरू युवा केंद्र धुळे येथील जिल्हा युवा अधिकारी अशोक कुमार मेघवाल यांनी सांगितले की, नाटक व चित्रपट समाजात खुप महत्वाचा भाग झाला आहे. आता तर चित्रपट व नाटक हे समाजाचा आरसा झाली आहेत. समाजातील भविष्य देखील चित्रपटाच्या माध्यमातून दाखवण्यात येत आहेत. तसेच भाषा देखील समाजाचा एक आरसा आहे.

सुप्रसिद्ध नाटककार प्रा. अनिल सोनार यांनी महाराष्ट्र शासनाने अशा कार्यक्रमाचे आयोजन केले म्हणून शासनाचे आभार मानले. महाराष्ट्रात कलावंतांची खाण आहे. तसेच कार्यक्रमाला किती डोके आहेत हे महत्वाचे नाही. संख्येवर न जाता रसिक महत्वाचा आहे. महाराष्ट्राची लोकधारा मी ह्याच शहरात बघितली आहे. शाहिर साबळे ह्यांचा थेट साने गुरुजींच्या सोबत संपर्क होता असे देखील सांगत कार्यक्रमाचे कौतुक केले. जेष्ठ शाहिर श्रावण वाणी यांनी सांगितले की, धुळे शहरात शाहिर साबळे घडले. आम्ही अनेक वर्षांपासून शाहिरी परंपरा टिकवून ठेवली आहे. देवदत्त यांच्या आयुष्यातील अनेक क्षण देखील त्यांनी यावेळी सांगितले. तसेच तरुण पिढीला शाहिर समजला पाहिजे. शाहिर म्हणजे कोण हे देखील समजले पाहिजे. बाबांच्या गाण्याला राज्यगीताचा दर्जा देखील प्राप्त झाला. तसेच सरकारने मान्यता देखील दिली आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे देखील त्यांनी यावेळी कौतुक केले.





**नाट्य प्रेक्षक योजना सुरु करणार : चंद्रशेखर पाटील**

नाट्य परिषदेने धुळेकर नागरिकांसाठी विविध नाटके, विविध कार्यक्रम आयोजित करावे अशी अपेक्षा माझ्याकडे सभासदांनी व्यक्त केली होती. ती देखील आम्ही पुर्ण करत आहोत असे कार्यक्रमाचे संयोजक तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य, जेष्ठ पत्रकार चंद्रशेखर पाटील म्हणले. नाटक प्रेक्षकांसाठी नाटक योजना देखील लवकर सुरू करु असे सांगून विविध कार्यक्रमांची माहिती देखील दिली. असेच कार्यक्रम घेऊन लवकरच भेटू असे देखील चंद्रशेखर पाटील यांनी धुळेकर नागरिकांना सांगितले.

**इतिहास जागविला**

शाहीर अमर शेख यांचे नातू शाहिर निशांत शेख यांनी देखील अनेक प्रसंग सांगितले. तसेच धुळे शहरातील आठवणीला उजाळा दिला. लोकशाहीर अमरशेख यांची शाहिरी परंपरा जपणारे त्यांचे नातू शाहीर निशांत जैनू शेख आणि त्यांच्या सहकार्यांनी कलात्मक अविष्कार साकारणारे जोशपूर्ण पोवाडे, लोकगीते सादर करीत महाराजांचा प्रेरक इतिहास जागविला. त्यांच्या भारदस्त आवाजाने रसिकांना त्यांनी मंत्रमुग्ध करून टाकले.

**लावणीची झलक**

'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' या कार्यक्रमात नृत्यांगना वर्षा दर्पे हिने महाराष्ट्राची लोककला लावणीची झलक दाखवली. या लावणीने प्रेक्षकांना भुरळ पडली. लावणीतील शब्दानुसार चेहऱ्यावरील भाव लक्ष वेधून घेत होते. लावणीचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक करीत दाद दिली. लावणीमुळे कार्यक्रमाला चारचाँद लागले.

# नाशिकरोड ते द्वारका डबलडेकर फ्लायओव्हरसाठी पालकमंत्र्यांचे केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांना प्रत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकरोड ते द्वारका हा पुणे-नाशिक, राष्ट्रीय महामार्गाचा एक भाग असून त्यावर मोठ्या प्रमाणात नागरी वाहतुकीसह अवजड वाहतूक होत असते. या विषम वाहतुकीमुळे या ७ किमीवर अंतरावर नेहमीच अपघात आणि गर्दी होते. हे लक्षात घेवून नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी पत्रव्यवहार करून ही कोंडी सोडविण्यासाठी डबल डेकर फ्लायओव्हरची अंतिम मंजुरी तसेच निधी तातडीने मिळून काम सुरू होण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे.

द्वारका ते नाशिकरोड याठिकाणी महा-मेट्रोने निओ मेट्रोचा प्रस्ताव तसेच उड्डाणपूलाचा प्रस्ताव एनएचएआयने दिला आहे. त्यामुळे दोन्हींची सांगड घालून डबलडेकर फ्लायओव्हर होणे गरजेचे आहे. या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यास वाहतूक कोंडी आणि अपघाताचे सत्र थांबणार आहे. द्वारका सर्कलमध्ये सतत गर्दी होत असते, रेल्वेस्टेशन, पुणे तसेच मुंबई - आग्रा हायवेला जोडणारे हे सर्कल असल्याने याठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या नेहमीच उद्भवत असते. द्वारका ते नाशिकरोड हा भाग भारत सरकारच्या सागरमाला योजनेत समाविष्ट असून, सागरमाला प्रकल्प हा भारत सरकारचा एक व्युहात्मक व ग्राहकाभिमुख प्रकल्प आहे. यामुळे उड्डाणपुलाचे काम तातडीने हाती घेणे अत्यावश्यक आहे. महामेट्रोकडे मेट्रोची अंतिम मंजुरी प्रस्तावित असून डबलडेकर पुलाच्या मंजुरीबाबत केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी विनंती केली आहे. नाशिकरोड - द्वारका या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास नाशिककरांची वाहतूक कोंडीची वाताहात थांबणार आहे. पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सक्रिय होत या योजनेसाठी वेळोवेळी एनएचएआयच्या अधिकाऱ्यांशी पालकमंत्री या नात्याने बैठका घेत तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

## आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात आनंद लोंढेचा जल्लोषपूर्ण सहभाग



**धुळे ।** शहरापासून जवळ असलेल्या मुंबई महामार्गावरील झोडगे गावाजवळ जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी समाजबांधव, तरुणांसोबत आदिवासी दिन जल्लोषात साजरा करताना आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद साहेबराव लोंढे व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अट्टल घरफोडे जेरबंद करण्यात एलसीबीला यश

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री येथे घडलेल्या चोरीचा समांतर तपास करताना एलसीबीने दोघा अट्टल घरफोड्यांना जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला. शिवाय, चोरीचे दागिने विकत घेणार्या एका सोनारालाही अटक झाली आहे. एलसीबीच्या कारवाईमुळे तीन गुन्ह्यांची यशस्वी उकल झाली.

मालपूर येथील जयंत पाडुरंग जाधव, ह.मु. शांतीनगर, नवापूर यांच्या साक्रीतील घरी चोरी झाली होती. चोरट्यांनी कडीकोयंडा तोडून किमती ऐवज लांबविला होता. यासंदर्भात २४ जुलै रोजी साक्री पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाल्याने एलसीबीने समांतर तपास केला असता पीआय हेमंत पाटील यांना सदरचा गुन्हा सराईत गुन्हेगार हेमंत अनिल सोनवणे (२५), रा. धनेर, ता. साक्री, अनिल गणेश पवार (२४), रा. तोरणपुडी, ता. साक्री आणि संदीप उर्फ तुलसीराम भिलू चौरे, रा. मचमाळ, ता. साक्री, जि. धुळे यांनी केल्याचे कळले. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने हेमंत सोनवणे आणि अनिल पवारला ताब्यात घेतले.

# मनपाचे हे अंदाजपत्रक म्हणजे 'खिसामा ना दमडी अन् मी खास कोंबडी'

### मनपा विरोधी पक्ष नेत्या कल्पनाताई महाले यांची टिका

**धुळे । प्रतिनिधी**



शहराच्या सर्वांगिण विकासासाठी सन २०२२-२३ चे सुधारीत व २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक अंतीम मंजुरीसाठी मनपाच्या महासभेत ठेवण्यात आले. मात्र, या अंदाजपत्रकावर मनपा विरोधी पक्ष नेत्या कल्पनाताई महाले यांनी खरमरीत टिका केली. मनपाचे हे अंदाजपत्रक म्हणजे 'खिसामा ना दमडी अन् मी खास कोंबडी' असे सांगत त्यांनी सत्ताधारी भाजपावर निशाणा साधला. तर सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक नागसेन बोरसे यांनी, सदर अंदाजपत्रक हे शिलकीचे नसुन तुटीचे असल्यावरही तरतुदी केवळ धुळेकर जनतेची दिशाभूल करण्यासाठी तयार करण्यात आल्याचा आरोप केला.

महापालिकेचे सन २०२२-२३ चे सधारित व २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकाला अंतिम मंजुरी देण्यासाठी महापालिकेच्या सभागृहात महापौर प्रतिभाताई चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली महासभा झाली. यावेळी आयुक्त देविदास टेकाळे, उपमहापौर वैशाली वराडे, नगर सचिव मनोज वाघ यांचेसह सदस्य चंद्रकांत सोनार, सुनिल बैसाणे, किरण कुलेवार, शितल नवले, अमोल मासुळे, वालीबेन मंडोरे, नागसेन बोरसे, विरोधी पक्ष नेत्या सौ.कल्पनाताई महाले, साबीर शेख, प्रदीप कर्पे आदी उपस्थित होते.

सुरवातीला महापौर प्रतिभा चौधरी यांनी शायराना अंदाजात अंदाजपत्रकातील बाबींवर उपस्थितांचे लक्ष वेधले. यात नगरसेवक निधीत १० लाखाहून १५ लाख रूपये करण्यात आलेली वाढ, अमृत अभियान-२ करीता १७० कोटींचा मंजूर निधी, मलनिःसारण योजनेसाठी १५६ कोटींचा निधी, हद्दवाढीतील गावांकरीता १७० कोटी असा अमृत अभियान -२ करीता ७१७ कोटी रूपयांच्या निधीला मान्यता मिळाली असल्याचे सांगितले. नगरोत्थान योजनेकरीता २१८ कोटींच्या निधीतून १८८ कोटी रूपयांची कामे सुरू असल्याचेही महापौरांनी यावेळी स्पष्ट केले. यासह प्रादेशिक पर्यटनाकरीता २०० कोटींचा निधी मंजूर झाला असून ६३४ कोटींची कामे सद्यपरिस्थितीत सुरू आहेत व १०८ कोटींच्या कामांकरीता प्रस्ताव शासनाला सादर केला असल्याचा खुलासा केला. २२६ पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू आहे. नाले सुशोभिकरणाकरीता १५० कोटी हद्दवाढीतील गावांकरीता १२६ कोटी प्रस्तावित असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या व्यतिरिक्त फ्लाय ओव्हर करीता २५ कोटी, पांझरा नदी किनारी ओट्यांकरीता १७५ कोटी, पार्क करीता ५० कोटी, रस्ते कामाकरीता १०० कोटींची तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात सुचविण्यात आल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यासह हद्दवाढीतील ३७ हजार ५२१ व देवपूर परिसरातील १३ हजार ५२० नविन मालमत्ता धारकांची नोंद करण्यात आल्याने भविष्यात मनपाच्या उत्पन्नात भर होणार असल्याचा अंदाजही महापौरांनी व्यक्त केला. शहरातील विविध विकास कामांमध्ये विद्यार्थ्यांकरीता नविन अभ्यासिका, महापौर केसरी कुस्ती स्पर्धा, महिला कुस्ती, चौक सुशोभिकरणाकरीता अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करण्यात आल्याचा खुलासाही त्यांनी यावेळी केला. शहरातील विविध चौकात महापुरूषांच्या पुतळ्यासाठी तीन कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडावी याकरीता प्रवेशद्वारासह कमानींसाठीही तीन कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे महापौर म्हणाल्या.

# पुरोगामी चळवळीचा आधारवड हरपला

### ज्येष्ठ लेखक, विचारवंत प्रा. हरी नरके यांचे निधन



**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि समता परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. हरी नरके यांचे निधन झाले आहे. वयाच्या ६० व्या वर्षी मुंबईतील एशियन हार्ट हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. समता परिषदेच्या मुंबईत होणाऱ्या बैठकीसाठी हरी नरके पुण्याहून मुंबईला येत होते. येताना पहाटे त्यांना उलट्यांचा त्रास होऊ लागला त्यामुळे बीकेसीच्या एशियन हार्ट रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला.

हरी नरके यांच्या निधनाने समाज एका पुरोगामी चळवळीला मुकला आहे. फुले व आंबेडकर यांच्या विचारांची व कार्याची प्रस्तुतता अधिक चांगल्या प्रकारे अधोरेखित करणे आणि शासकीय पातळीवर वेगाने निर्णय घडून आणण्यामध्ये हरी नरके यांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्र शासनाने समग्र महात्मा फुले हा एक हजार पानाचा ग्रंथ अद्ययावत करून प्रकाशित केला, त्याचे संपादक हरी नरके होते. डॉ आंबेडकरांच्या समग्र वाङ्मयाचे राज्य शासनाने २६ खंड प्रकाशित केले, त्यातील सहा खंडांचे संपादन हरी नरके यांनी केले होते.

## कार्यतत्परता जास्त महत्वाची

राज्याच्या आरोग्य विभागातील सर्व रुग्णालयांमध्ये यापुढे पूर्णतः मोफत उपचार करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यात उपचार आणि आरोग्य चाचण्यांचा समावेश आहे. केसपेपर काढण्यासाठी दहा रुपये देखील रुग्णांना यापुढे मोजावे लागणार नाहीत. आरोग्य विभागाची विविध प्रकारची चोवीसशे पेक्षा जास्त रुणालये आहेत. याशिवाय राज्यातील रुग्णांसाठी महात्मा फुले जनआरोग्य आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य या दोन योजना एकत्रित राबवल्या जातात.

राज्य सरकारने नुकतीच महिलांची नुकतीच मोफत आरोग्य तपासणी केली. त्याचा राज्यातील हजारो महिलांनी लाभ घेतल्याचे सांगितले गेले. तरीही सरकारी आरोग्य व्यवस्था लोकांना विश्वासार्ह का वाटत नसावी? या व्यवस्थेचे अधूनमधून धिंडवडे का निघत असावेत? शहापूर तालुक्यातील भवरपाडा येथील एका लहानग्याच्या पालकांना या व्यवस्थेचा विदारक अनुभव नुकताच घ्यावा लागला. आठ वर्षाच्या मुलाची तब्येत बिघडली. गावात रस्ता नसल्याने त्याच्या पालकांनी पायपीट करत ठाणेवान्द्रे येथील सरकारी आरोग्य केंद्र गाठले. पण दुर्दैवाने अडचणींनी त्यांची पाठ तिथेही सोडली नाही. केंद्रात कोणीही वैद्यकीय अधिकारी हजर नव्हते. त्यामुळे आजारी मुलाची दोन सरकारी रुग्णालयात उचलबांगडी करावी लागली. पण त्याचा उपयोग झाला नाही. पालकांनी त्यांचा मुलगा गमावला. अशा आशयाचे वृत्त माध्यमात अधूनमधून प्रसिद्ध होते.

रुग्णांना झोळी करून रुग्णालयात न्यावे लागल्याची छायाचित्रे प्रसिद्ध होतात. लोक आरोग्य व्यवस्थेवर खुश का नसावेत? त्यांना तसे अनुभव येत नाहीत हे त्यांच्या नाखुषीचे कारण असू शकेल. आरोग्य व्यवस्थेचे अनारोग्य बिघडले असेल तर मोफत उपचार किती फायद्याचे ठरू शकतील? उपचारच वेळेत आणि योग्य मिळाले नाही तर मोफत योजना काय कामाच्या असा प्रश्न लोकांना पडला तर त्यात नवल ते काय? शहापूर घटनेतील पालकांना आरोग्य योजनांचा किंवा मोफत उपचारांचा फायदा का होऊ शकला नाही? सरकारी आरोग्य व्यवस्थेचा पसारा मोठा असल्याचे सांगितले जाते. आरोग्य विभागाच्या सेवेचा दरवर्षी तीन कोटींपेक्षा जास्त रुग्ण बाह्य रुग्ण विभागात तर तीस लाखांपेक्षा जास्त रुग्ण आंतररुग्ण सेवेचा लाभ घेतात असे सांगितले जाते. तथापि पसारा मोठा आहे म्हणून थोडेफार अधिकउणे लोकांनी चालवून घ्यावे असा सरकारचा भ्रम झाला असावा का? समस्या फक्त आरोग्य सेवक आणि कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेची नाही. उपचारास सहाय्यभुत ठरणारी यंत्रणा असते तर त्याचा वापर करणारे कुशल कर्मचारी नसतात. ते उपलब्ध असले तर यंत्रणा नादुरुस्त असते. हजारो पदे रिक्त आहेत. डॉक्टर आणि विशेष डॉक्टरांची संख्या पुरेशी नाही. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात शिकून डॉक्टर होणारे विद्यार्थी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा देण्यास नाखूष असतात. प्रसंगी दंड भरण्याची देखील अनेकांची तयारी असते. ते नाखूष का असतात याचे एक कारण आरोग्य व्यवस्थेचे अनारोग्य हे देखील असू शकेल. सत्ताधारी बदलतात पण आरोग्य व्यवस्थेचे अनारोग्य तसेच राहाते, किंबहुना ते वाढतच जाते. उपचार मोफत मिळण्याऐवजी कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता बदलावी, डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित असावेत आणि उपचार वेळेत मिळावेत एवढीच जनतेची यापुढे अपेक्षा असेल.

# पहिला अविश्वास पं. नेहरूंविरोधात

काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात लोकसभेत अविश्वास प्रस्ताव दिला आहे आणि सरकारनेही त्याला सडेतोड उत्तर देण्यासाठी भरभक्कम तयारी केली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संसदेतील पहिला अविश्वास प्रस्ताव १९६३ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारविरोधात मांडला गेला होता व पं. नेहरूंनीही त्याचे स्वागत केले होते. १९६२ मध्ये भारत-चीन युद्ध झाले होते, त्या युद्धात भारताचे खूप नुकसान झाले. युद्धात मार खाल्यानंतर काँग्रेसमधेही पं. नेहरू सरकारच्या विरोधात नाराजी होती आणि विरोधी पक्षात संताप प्रकट केला जात होता. डॉ. राम मनोहर लोहिया, आचार्य जे. बी. कृपलानी, दीनदयाळ उपाध्याय असे दिग्गज नेते नेहरू यांच्या सरकारवर जाब विचारण्यासाठी तटून पडले.

एकीकडे पं. नेहरूंची प्रकृती त्यांना पुरेशी साथ देत नव्हती, दुसरीकडे पक्षात अस्वस्थता होती आणि तिसरीकडे समोरून विरोधी पक्षांकडून सरकारवर धारदार हल्ले होत होते. फेब्रुवारी १९६२ मध्ये झालेल्या तिसऱ्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ४९४ पैकी ३६१ जागांवर विजय मिळाला. पं. नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीला दीड वर्षांपेक्षा थोडा जास्त काळ झाला होता आणि चीनच्या विरोधात युद्धाला समोरे जाण्याची पाळी भारतावर आली. १९६२ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर जुलै १९६३ पर्यंत झालेल्या दहा पोटनिवडणुकांमध्येही काँग्रेस पक्षाला मोठे झटके बसले. दहा निवडणुकांपैकी केवळ चारच ठिकाणी काँग्रेसच्या पदरात विजय मिळाला. फर्रुखाबादमधून राम मनोहर लोहिया व अमरोहामधून कृपलानी मोठ्या फरकाने विजयी झाले. अशा पार्श्वभूमीवर लोकसभेत विरोधी पक्षाने पं. नेहरू यांच्या सरकारच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणला.

लोकसभा अध्यक्ष सरदार हुमुकमसिंग यांच्याकडे एक नव्हे तर विरोधी पक्षांकडून नेहरू सरकार विरोधात अनेक अविश्वास दर्शक प्रस्ताव सादर केले गेले होते. पहिला प्रस्ताव प्रजा समाजवादी पक्षाचे आचार्य जे. बी. कृपलानी यांनी दिला होता. दुसरा प्रस्ताव मंदसौरमधून निवडून आलेले भारतीय जनसंघाचे खासदार उमाशंकर त्रिवेदी आणि खरनगोनमधून निवडून आलेले रामचंद्र बडे यांनी दिला होता. मात्र या दोन्ही सदस्यांनी कृपलानी यांनी दिलेल्या प्रस्तावामुळे आपला प्रस्ताव मागे घेतला. पं. नेहरू सरकारच्या विरोधात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सदस्य रेनू चक्रवर्ती व एस. एम. बॅनर्जी यांनी दिला होता. पण त्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ अनुमोदक म्हणून केवळ ३६ सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या. प्रस्ताव अध्यक्षांनी स्वीकारण्यासाठी त्यावर किमान ५० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असल्या पाहिजेत, असा लोकसभेचा नियम आहे.

याखेरीज सोशॅलिस्ट पक्षाचे रामसेवक यादव (बाराबंकी), हिंदू महासभेचे खासदार बिशन चंद्र शेठ (इटा), प्रजा समाजवादी पक्षाचे सदस्य सुरेंद्रनाथ द्विवेदी (केंद्रपाडा) यांनीही अविश्वास प्रस्ताव दिला होता. पण प्रस्तावाचे समर्थन करणाऱ्या ७२ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असलेला कृपलानी यांचा प्रस्ताव अध्यक्षांनी स्वीकारला आणि त्यावर १९ ऑगस्ट १९६३ रोजी संसदेच्या पावसाळी अधिवेशात चर्चा झाली. अविश्वास ठराव मांडताना कृपलानी यांनी चीन युद्धात झालेल्या पराभवापासून ते सरकारमधील भ्रष्टाचारावर सडकून टीका केली. सत्ताधाऱ्यांनी एक चिमूटभर मीठ पैसे न देता घेतले तर सरकारी बाबू लोक संपूर्ण देश लुटत राहतात, अशी म्हण त्यांनी आपल्या भाषणातून ऐकवली. आपण जे काही गुप्तपणे करतो ते आपल्या कर्मचारी वर्गाला कळत नाही, असा



जर मंत्र्यांचा समज असेल, तर ते मंत्रीमहोदय मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत, असे म्हणावे लागेल. विदेश नितीमध्ये सरकारला अपयश आले आहेच, शिवाय देशांतर्गत धोरणांतही सरकार अपयशी ठरले आहे. देश नैराश्यवादाने वेढला आहे.

आपल्याला विरोधी पक्षाचे पूर्ण समर्थन आहे, असे सांगून कृपलानी म्हणाले, या सभागृहातील (विरोधी बाकांवरील) केवळ ७३ सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मी उभा आहे, असे सरकारने समजू नये. गेल्या निवडणुकीत काँग्रेसला ४५.२७ टक्के मतदान झाले होते आणि विरोधी पक्षांकडे मिळून ५४.७६ टक्के मतदान होते. विरोधी पक्षांच्या बाकावर वेगवेगळे पक्ष असले तरी आमची एकजूट होऊ शकते. यावेळी आम्ही सर्व बरोबर आहोत. विरोधी पक्षांनी नियोजन आयोग संपुष्टात आणा, अशीही मागणी केली होती. (पन्नास वर्षांनी सन २०१४ मध्ये मोदी सरकारने नियोजन आयोगाचे रूपांतर निती आयोगात केले.) जनसंघाचे खासदार त्रिवेदी यांनी नियोजन आयोग गुंडाळण्यात यावा, अशी मागणी केली. नियोजन आयोगाने कोणत्याही गोष्टींची पूर्तता झालेली नाही. योजनाबद्ध देशाचा विकास झाला व देश समृद्ध झाला तर आम्हाला आनंद होईल, असेही ते म्हणाले.

राम मनोहर लोहिया यांनी नियोजन आयोगाच्या अहवालाचा संदर्भ देऊन देशातील ६० टक्के जनता दरमहा २५ रुपये मिळकतीवर गुजराण करीत आहे, असे सांगितले. दुसरीकडे पंतप्रधानांच्या कुत्र्यावर रोज ३ रुपये खर्च होतो आहे. अर्थात या आकडेवारीचे पं. नेहरूंनी आपल्या भाषणातून खंडन केले. मोरारजी देसाई, सुभद्रा जोशी, भागवत झा आजाद यांनी अविश्वासाच्या प्रस्तावावर सरकारची बाजू लढवली. पं. नेहरूंनी मात्र विरोधकांच्या टीका- टिप्पणीचे स्वागत करून आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, विरोधकांनी सरकारच्या विरोधात आणलेल्या अविश्वासदर्शक प्रस्तावाचे मी स्वागत करतो. असे प्रस्ताव वेळोवेळी आले तर सरकारची परीक्षा होईल, सरकारच्या दृष्टीने हे चांगलेच होईल. विरोधी पक्षांची एकता आणि सरकारवर जोरदार झालेली टीका ऐकून पंतप्रधान पंडित नेहरू म्हणाले, विविध विरोधी पक्ष एकत्र आलेले आहेत ते केवळ सरकारच्या विरोधात प्रस्ताव आहे म्हणून. सरकारच्या विरोधात म्हणण्यापेक्षा आपल्या व्यक्तिगत विरोधात टीका केली जात आहे, हे मला योग्य वाटत नाही. विरोधी पक्षांतील सर्वच जण आपल्यावर वैयक्तिक टीका करीत आहेत, असे मी म्हणत नाही. मात्र सरकारविरोधी नकारात्मक भूमिकेतून विरोधी पक्ष एकत्र आले आहेत. विरोधी पक्षांकडे बहुमत नाही हे उघड आहे, खरे तर असा प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही असे अपेक्षित होते. पण प्रथमच अविश्वास प्रस्ताव स्वीकारला गेल्यामुळे विरोधी पक्ष एकाच व्यासपीठावर एकत्र येण्यास संधी प्राप्त झाली. विरोधकांची भाषणे ही सरकारविरुद्ध नव्हती तर केवळ सरकारचा नेता म्हणून व्यक्तिगत माझ्या विरोधात होती, असे मला जाणवले. केवळ नकारात्मक भूमिकेतून विरोधी पक्ष एकत्र झाला असेच मला चर्चा ऐकताना वाटले.

पं. नेहरू यांच्या सरकारविरोधात आणलेला अविश्वासाचा प्रस्ताव हा संसदेच्या इतिहासात पहिला म्हणून नोंदवला गेला. अपेक्षेप्रमाणे हा प्रस्ताव ६२ विरुद्ध ३४७ मतांनी फेटाळला गेला. कारण विरोधी पक्षाकडे पुरेसे बहुमत नव्हतेच. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अविश्वास प्रस्तावाच्या निमित्ताने सारे विरोधी पक्ष एका मंचावर आल्याचे चित्र बघायला मिळाले. कृपलानी यांनी मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावावर तेव्हा चार दिवस, २० तास चर्चा झाली होती. एक मात्र निश्चित की, देशाचे उत्तुंग नेतृत्व म्हणून ओळखले जाणाऱ्या नेहरूंच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आल्यानंतर नेहरूंचा काँग्रेस पक्षातील दबदबा कमी होऊ लागला आहे, अशी चिन्हे दिसू लागली. सप्टेंबर १९६३ च्या अखेरीस मुख्यमंत्री कामराज यांच्या सूचनेनुसार नेहरूंनी मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे राजीनामे मागितले. कामराज योजनेचे हे पहिले पाऊल अशी त्याची नोंद झाली. पक्षात जे ज्येष्ठ नेते आहेत, त्यांना सत्तेच्या पदावरून दूर करून पक्ष संघटनेच्या बांधणीच्या कामात सहभागी करून घ्यावे असा प्रस्ताव कामराज यांनी दिला होता. स्वत: कामराज ऑक्टोबर १९६३ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष झाले. जगजीवन राम, लाल बहादूर शास्त्री यांचे स्थान पक्षात मजबूत होतेच. दरम्यान पं. नेहरूंची प्रकृतीही ढासळू लागली. दि. २७ मे १९६४ रोजी नेहरूंचे निधन झाले. १९६७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसची केंद्रात पुन्हा सत्ता आली, पण देशातील विविध राज्यांत मोठ्या प्रमाणावर पक्षांतराची लागण झाली. उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरयाणा आदी राज्यांत बिगर काँग्रेसची सरकारे स्थापन झाली.

**- इंडिया कॉलिंग: डॉ. सुकृत खांडेकर**

# कर्जबाजारीपणामुळे होणाऱ्या आत्महत्या कधी थांबणार?

आजपर्यंत आपण सातत्याने पाहत आलो की आपला बळीराजा शेतकरी सतत कर्जात डुबलेला असल्यामुळे, शासनाचे कोणतेही निश्चित ध्येयधोरण, उपाययोजना नसल्याने मृत्यूला कवटाळत आहे. जी काही ध्येय-धोरणं, तजवीज या आत्महत्या थांबविण्यासाठी केली जात असतात ती वेळेत आणि अपेक्षित प्रमाणात न मिळाल्यामुळे नैराश्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या, गहाण पडलेल्या शेत जमिनी, सावकारांचा तगादा, कोठूनही घेतलेल्या कर्जाचे थकलेले हप्ते यामुळे हतबल होऊन अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. आजपर्यंत आपण आपल्या कृषी प्रधान देशात शेतकरी आत्महत्या थांवण्यात पूर्णपणे यशस्वी झालेलो नाही, हे आपलं दुर्दैव आहे. त्यातूनच आजमितीला सुशिक्षित चांगल्या कुटुंबातील, शिकले सवरलेले लोकं देखील केवळ डोईजड झालेल्या कर्जामुळे, खासगी सावकारांकडून भरमसाट व्याजाने पैसे घेऊन ते वेळेत न फेडू शकल्यामुळे, उधार



उसणवारीचे प्रमाण फेडण्याच्या पलीकडे गेल्यामुळे आत्महत्या करत आहेत. वाढत्या आत्महत्यामागील बहुतांश कारणं जर पाहिलीत तर त्यात आर्थिक ओढाताण, कर्ज, उद्योग धंद्यात आलेले अपयश, आर्थिक नुकसान, तोटा, कर्ज वसुलीसाठी वापरली गेलेली अमानुष अपमानास्पद वागणूक, अर्वाच्य भाषा, शिवीगाळ यांसारखी कारणं मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

आपल्याला असलेली नियमित आर्थिक आवक, उत्पन्नाचे साधन, होणारा खर्च तसेच आपली आर्थिक परिस्थिती आणि कोणत्याही अचानक उद्भवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी आपण केलेली बचत अथवा तजवीज याचा ताळमेळ सगळ्यांनाच जमतोय असं नाही. दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पैसा मिळवण्यासाठी वापरले जाणारे शॉर्टकट, लवकरात लवकर श्रीमंत होण्यासाठी केलेले उलटे-पालटे व्यवहार यासारख्या सवयी आपल्या जीवावर उठत आहेत.

अनेक सर्वसामान्य कुटुंब नवीन घर, घराचं नूतनीकरण, नवी गाडी, छोट्या मोठ्या घरगुती वस्तू, फर्निचर, मुलांचं शिक्षण, लग्न यासाठी कर्ज घेतात. आपण प्रगती करावी, लवकरात लवकर सेटल व्हावे, आपल्या हक्काचं स्वमालकीचं सर्व काही आपल्याकडे असावं, आपल्याला उच्च राहणीमान उपभोगता यावं, समाजात आपल्याला पण मिरवता यावं या अपेक्षा ही स्वप्न पाहत असताना त्यासाठी भरपूर प्रयत्न, प्रामाणिक कष्ट सर्वसामान्य माणूस सातत्याने करत असतो. हे करणं गैर नाही, आपण महत्त्वाकांक्षी नक्कीच असावं पण त्यासाठी चुकीचे निर्णय, चुकीच्या लोकांकडून घेतलेली आर्थिक मदत आपल्या अंगलट येऊ शकते, याचेही भान जपणे आवश्यक आहे. आज-काल पती-पत्नी दोघेही कमावते असल्यामुळे कर्जाचे हफ्ते देखील व्यवस्थित फेडले जातात, अतिशय तरुण वयात स्वतःच सुसज्ज घर, गाडी घेऊन झपाट्याने ते भविष्याचे नियोजन करायला लागतात. पण काहींच्या बाबतीत हे शक्य होत नाही आणि आयुष्याची घडी विस्कटून जाते.

सगळ्यांनाच सर्व काही जमेल, सगळेच आर्थिक गणित आपल्या नियोजनानुसार जुळेल याबद्दल काहीच शाश्वती नसते. आपल्याला नोकरी अथवा व्यवसायामार्फत निश्चित स्वरूपात पगार अथवा इनकम असेल तर आपण कोणत्याही अधिकृत, कायदेशीर मार्गाने कर्ज घेऊ शकतो, ते परत फेडू शकतो. जर कोणत्याही अधिकृत ठिकाणांवरून कर्ज नाकारलं गेलं, आपण त्याच्या नियमात बसत नसलो, तर आपण खासगी सावकार, व्याजाने पैसे घेणे, सोनं तारण ठेवणे, अथवा इतर कोणतीही मौल्यवान वस्तू तारण ठेवून वाटेल त्या व्याज दराने पैसे उचलतो. भविष्यात काहीतरी तजवीज होईल, उत्पन्न मिळेल, कोणी नातेवाईक, मित्र मदत करेल या भाबड्या आशेवर आपण मोठी जोखीम स्वीकारतो. अशा अनधिकृत पद्धतीने घेतलेले पैसे व्याजाचे मीटर सुरू झाल्यावर प्रचंड त्रासदायक ठरतात. उसने अथवा व्याजाने पैसे घेऊन त्याचे व्याज वेळेत न भरल्यास लावला जाणारा तगादा आपली मानसिकता उद्विग्न करून टाकतो. व्याज अथवा मुद्दल वसूल करण्यासाठी वापरली जाणारी भाषा, दिल्या जाणाऱ्या धमक्या, मानसिक खच्चीकरण, बदनामीची भीती, घरातील बाई माणसाची पणाला लागलेली अब्रू कोणत्याही सर्वसामान्य घरातील, कुटुंबातील माणसाच्या सहनशक्तीच्या पलीकडे असते. अशा प्रकरणात केले जाणारे ब्लॅकमेल, सतत येणारे फोन, मेसेज, सातत्याने दारात येणारी माणसं, कर्जबाजारी पणामुळे समाजात होणारी मानहानी यामुळे सर्वसामान्य माणूस खचून जातो.

**क्रमश:**

**- फॅमिली काऊन्सलिंग : मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-१४५



आडवे शब्द -

१. श्रीकृष्ण ३. श्रीकृष्णाचे वाद्य ५. श्रीकृष्णाचे शस्त्र ९. वर्षाव, भडिमार ११. भुरभुरता बर्फ १३. भिस्त, अवलंबून राहणे १४. पती, मालक १६. तळे १७. डोळ्याचे एक प्रसाधन १८. ताटातूट २०. डाळीचा पातळ पदार्थ २१. वायू २२. सापडणारा उपाय २४. दरोडेखोर २६. राजाचे घर २८. लहान मूल ३०. पहिले पाऊल ३३. अडथळा ३५. तणाव ३६. किंतू, संशय ३७. दुधाचा एक दुर्मिळ पदार्थ ३९. लाकडाच्या वस्तू करणारा ४१. कापसाचे बी ४२. करकर वाजणारे पायताण ४३. तीव्र स्पर्धा ४४. पात्याची तीक्ष्णता ४७. भव्य, मोठे ४८. जुगार ४९. तप करण्याची जागा ५०. दुर्दैवी ५२. टिकून राहणे, टिकाव ५३. आठवण ५४. नरम नेमस्त ५६. हस्त पण नक्षत्र नव्हे! ५७. कुरापत ५९. प्रियकर, पती ६१. टपाल ६२. आई ६३. चार वेदांपैकी एक ६४. जमाखर्च लिहिण्याची वही ६६. दुग्धजन्य पदार्थ व दूधविक्रीचे दुकान ६९. समजायला सेपे ७०. आवड ७१. हाकेला दिलेला प्रतिसाद ७२. धाक, दरारा ७४. वाहनात सामान ठेवायची जागा (इंग्रजी) ७६. रंक ७७. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती ७९. इंद्राची पत्नी ८०. निष्णात ८१. सहजगत्या ८२. वांती ८३. लाट, लहर

उभे शब्द -

२. वनिता ४. मैत्रीण ५. श्रीकृष्णाला पोहे नेणारा बालमित्र ६. प्रत्येक ७. असंमती ८. विकत घेणे ९. आईचा भाऊ १०. जंगली १२. चिलट १३. मृत्यू १५. सुखाचे मोजमाप करणारे धान्य १६. उघडलेले तोंड १७. कामधेनू १८. विश्रांती, थांबणे १९. ओझेवाहू २१. योग्य २३. कमी वजनाचा २५. विहीर २५अ. तोंड दाखवणारा २७. '--- तो वजीर' २८. हस्तलिखित २९. '------ कोण कामास येतो?' ३१. देव, देणारा, एक आडनाव ३२. रामायणकार ३३. इच्छा ३४. पृथ्वी ३६. चोरटा आवाज ३७. भांडण ३८. व्रत ४०. सारासार विवेक ४३. विडी ४५. जमीन, पृथ्वी ४६. शंभर ४८. सर्वत्र ५१. ओझे ५२. धष्टपुष्ट ५४. सूर्याचे, सूर्यापासून प्राप्त ५५. तालमीतील मारुती ५८. किंवा ६०. दिन ६२. सुवर्णमृगाचे रुप घेणारा राक्षस ६५. चांदणी

## शब्दकोडे १४४ चे उत्तर

आडवे उत्तर - १.सुबत्ता ५.अंगाईगीत ९.ताटाखालचे मांजर ११.अज १२.कराल १४.भला १५.रजनीकांत १६.तसा २१.धग २२.सटरफटर २४.केली २५.थोतांड २६.बरा २७.वाट २८.वसन ३०.कोरड ३१.संपत्ती ३२.सून ३४.सूप ३५.वधू ३७.समा ३९.गीतरामायण ४१.रट्टा ४२.गाय ४३.घाई ४४.नट ४५.राख ४६.जोर ४७.घोर ४८.वाया ४९.पचका ५१.रड ५२.विडा ५४.कनक ५६.अविट ५८.जमीनदोस्त ५९.राजमाता ६१.पारडे ६२.वग ६४.लीन ६५.पळ ६६.लघळ ६८.नवरात्र ७१.हल्ली ७२.खंबीर ७३.पितर ७४.स्तवन ७६.चाड ७७.सखा ८०.ऋणको ८१.एकनाथ ८२.जथा ८३.अन्य

उभे उत्तर - २.बहिरा ३.कटाक्ष ४.सुलभ ५.अंजन ६.गार ७.गीतांजली ८.रजत १०.चेला ११.अकांडतांडव १२.कर्मधर्मसंयोगाने १३.लत १७.सासरा १८.परवानगी १९.बारव २०.कोकेन २३.फट २५.थोर २६.बत्तीस २९.समयसूचकता ३०.कोपरखळी ३३.विराट ३६.धूसर ३८.माघार ४०.तनया ४६.जोडवी ४७.घोडनवरा ४८.वाडा ५०.कान ५१.रमी ५२.विस्तव ५३.अंजली ५५.कपाळ ५६.अडेलतट्टू ५७.टवाळ ५८.जमीन ६०.मानखंडना ६३.गहन ६५.परस ६७.घर ६९.वहाण ७०.त्रस्त ७५.वध ७६.चाक ७८.खाज ७९.वन्य

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### वावीत हजारोंचा गुटखा जप्त

**नाशिक ।** तालुक्यातील वावी येथील एका किराणा दुकानातून तब्बल १२ हजारांचा गुटखा जप्त करण्यात वावी पोलिसांना यश आले आहे. पोलिस निरीक्षक चेतन लोखंडे यांना गुप्त बातमीदारांमार्फत सदर माहिती मिळाली होती. त्यांनतर लोखंडे यांनी तात्काळ वावी येथील किराणा दुकानदार विजय उर्फ विलास निवृत्ती गायकवाड हे चोरीच्या माध्यमातून गुटखा विकत असताना त्यांना रंगेहाथ पकडले. वावी गावातील साई चैतन्य किराणा जनरल स्टोअर्स येथे लोखंडे यांच्यासह पोउपनि बी.आर.आहेर, पो. ह. सतीश बैरागी, प्रवीण कुरवडे, शहाजी शिंदे, शैलेश शेलार यांनी जाऊन दुकानाची झडती घेतली असता दुकानात विविध कंपन्याचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखू व पानमसाला असा मुद्देमाल मिळून आला.

### बेस्टचा संप; नाशिकच्या ७५ बसेस मुंबईत मदतीला

**मुंबई ।** मुंबईतील बेस्टमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मागण्यांसंदर्भात संप पुकारल्याने तेथील प्रवाशांचे हाल सुरू झाले आहेत. त्यावर तोडगा म्हणून उफराटा कारभार करत शासनाने नाशिकच्या तब्बल ७५ एस.टी. बसेस मुंबईला रवाना केल्या. त्यामुळे मात्र नाशिकच्या प्रवाशांचे हाल सुरू झाले. ग्रामीण भागात जाणारे विद्यार्थी, कामगारांची यामुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय झाल्याने एसटीविरोधात संताप व्यक्त होत आहे. बेस्टच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे तसेच वेतन आणि इतर सुविधांच्या मागण्यांसाठी मुंबई महानगरात सेवा पुरविणाऱ्या बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे.

# ११ वी राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धा नाशिकमध्ये १२ ते १५ ऑगस्ट दरम्यान

### २८ राज्य, ८ केंद्रशासीत प्रदेशातून ९०० खेळाडू होणार सहभागी

**नाशिक । प्रतिनिधी**

इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन (आयपीएसएफ) यांच्या मान्यतेने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन (एमपीएसए) यांच्यातर्फे ११ वी राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट वरीष्ठ वयोगटातील महिला व पुरूष स्पर्धा येत्या १२ ते १५ ऑगस्ट दरम्यान पंचवटीतील मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे पार पडणार आहे. स्पर्धेत एकूण २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश तसेच ऑल इंडिया पोलीस, बीएसएफ, आयटीबीपी संघ असे एकूण ९०० खेळाडू सहभागी होत असल्याची माहिती इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्य असोसिएशनचे महासचिव किशोर येवले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

किशोर येवले म्हणाले की, या राष्ट्रीय स्पर्धेचे उद्घाटन १२ ऑगस्टला सायंकाळी ५ वाजता राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खा. हेमंत गोडसे, माजी आमदार जयवंत जाधव, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, कार्यकारी अधिकारी मोहोम्मद इकबाल या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर स्पर्धेला सुरुवात होईल. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला सायंकाळी ५ वाजता आयपीएसएफचे खजिनदार इरफान अजीज भुट्टा, एमपीएसएचे अध्यक्ष सुरेंद्र प्रताप सिंग, मुख्य सल्लागार ड. विशाल सिंग, खजिनदार मुकेश सोनवणे यांच्या हस्ते पार पडणार आहे.




#### खेळाडूंची होणार निवड

**या खेळाचा समावेश गोव्यामध्ये होणार्या ३७ व्या राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये १४ मे २०२३ रोजी भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने केला आहे. ११ व्या राष्ट्रीय स्पर्धेतून विजयी होणार्या प्रत्येक वजनगटातील १६ खेळाडूंची निवड गोव्यामध्ये होणार्या ३७ व्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी केली जाणार आहे. या खेळामध्ये मागील ११ वर्ष महाराष्ट्र संघ अव्वल स्थानी आहे. त्यामुळे वर्चस्व कायम राखण्याची संधी या स्पर्धेनिमित्त उपलब्ध होणार आहे.**

**पिंच्याक सिलॅट खेळ इंडोनेशियन मार्शल आर्टचा क्रीडा प्रकार आहे. टेंडिंग (फाईट), तुंगल (सिंगल काता), रेगु (ग्रुप काता), गंडा (डेमो फाईट), सोलो (इव्हेंट) अशा पाच प्रकारांमध्ये हा खेळ खेळला जातो. १ सप्टेंबर २०२० ला या खेळाचा समावेश केंद्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने आपल्या ५ टक्के राखीव नोकर भरतीमध्ये केला आहे. या खेळाला केंद्र सरकारच्या युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालय, भारतीय विश्वविदयालय संघ, अखिल भारतीय पोलीस खेळ नियंत्रण बोर्ड आणि ऑलिम्पिक, कौन्सिल ऑफ एशियाची मान्यता आहे. हा खेळ एशियन गेम, एशियन मार्शल आर्ट गेम, युथ गेम व ऐशियन बिच गेम, भारतीय विश्वविद्यालय, खेळ खेलो इंडिया वुमन्स पिंच्याक सिलॅट लिग अशा अधिकृत राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये खेळला जातो.**

### शिवरायांच्या प्रेमाने प्रेरित होऊन हेमराज एम.के. या तरुणाने

# सायकलवर १८ महिन्यात २८० गडकोट केले सर





**नाशिक । प्रतिनिधी**

हेमराज एम. के. हा तरुण केरळच्या कालीकट शहरातला असून त्याने वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली आहे .पुढे काही काळ सौदी अरेबिया व दुबई येथे नोकरी केली. नंतर त्याच्या जीवनात छत्रपती शिवरायांचा इतिहास आल्याने त्याने त्यातून प्रेरणा घेतली. सरळ केरळहून महाराष्ट्रात १ मे २०२२ रोजी त्याने सायकलवर केरळ सोडले. २२ मे २२ रोजी महाराष्ट्रात प्रतापगड गाठला. तत्पूर्वी त्याने महाराष्ट्रातील शिवरायांच्या अनेक गडकोटांचे युट्युबवर माहिती मिळवली. त्याने संकल्प करून महाराजांचे सर्वचे सर्व गडकोट सर करण्याची योजना आखली.

गेल्या १८ महिन्यात त्याने २८० गड सर केले. या प्रवासात त्याने कोल्हापूरला छत्रपती संभाजी महाराज तसेच साताऱ्याचे छत्रपती उदयनराजे यांचीही भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या प्रवासात त्याला अनेक दुर्गप्रेमी व गडकोट संवर्धन करणाऱ्या संस्थांनी सहकार्य केले. काल ८ ऑगस्ट रोजी नाशिकच्या गरुड झेप प्रतिष्ठानने त्याचा सन्मान केला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संदीप भानोसे यांनी त्याचे कौतुक करत त्याचा गौरव केला. त्याने सर्व मराठी तरुणांना संदेश दिला की, केरळचा एक तरुण मुलगा महाराष्ट्रात येऊन शिवरायांचे सर्व गडकोट बघण्याचा संकल्प करतोय ही प्रेरणादायी घटना. आपण सर्वांनी यातून शिकले पाहिजे. किमान नाशिक मधील लोकांनी तरी नाशिकमधले ६५ दुर्ग पहावे. शक्यतो त्यावर संवर्धन व स्वच्छता करण्याचा प्रयत्नही करावा. यावेळी गरुड झेप प्रतिष्ठानचे जागतिक विक्रमवीर सागर बोडके, अंजना प्रधान, संकेत भानोसे, रेणू भानोसे, अविनाश क्षीरसागर व संगीता भानोसे उपस्थित होते. शिवरायांच्या प्रेमापोटी हेमराजने आपले नाव देखील कायदेशीररित्या बदलले आहे. त्याने आता शिवराज गायकवाड हे नाव धारण केले आहे. येत्या काही महिन्यात शिवराज नासिक येथील कावनाई, ट्रिंगलवाडी, कळसुबाई शिखर तसेच शिवरायांचे सागरी गडकोट बघणार आहे.

## श्री गजानन महाराजांच्या रजत मुखवट्याची पूजा

**नाशिक । प्रतिनिधी**

अधिक मास अर्थात पुरूषोत्तमा मास विष्णू सहस्त्रनाम तसेच गंगास्नानास तसेच नित्य उपासना, व्रत, दान केल्याने जन्मानंतर येणारे संकटे, दारिद्र्य यांचा नाश होतो अशी भावना आहे.

अधिक मासानिमित्त श्री. गजानन महाराज सेवा संस्था, नासिक श्री. गजानन महाराजांच्या रजत मुखवटा शिंगाडा तलाव नासिक येथे भाजपच्या माजी महिला महानगरप्रमुख सुजाता करजगीकर यांच्या घरी आणण्यात आला. सकाळी ११वाजता महाराजांना लघुरूद्र अभिषेक करण्यात आला. तसेच अधिक मासानिमित्त समीर करजगीकर, श्री व सौ सुचित्रा आदिश शहा या यजमानांनी सत्यनारायणाची पुजा केली. या सोहळ्याप्रसंगी शेकडो भाविक -भक्तांनी श्री गजानन महाराजांचे दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला.



### मेरी माटी मेरा देश' या अभियानांतर्गत विभागीय आयुक्त कार्यालयातील

## अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली पंचप्रण शपथ

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी मूल्यांना समोर ठेवून मेरी माटी मेरा देश अंतर्गत संपूर्ण देशभर एक विशेष मोहिम हाती घेतली आहे. ९ ऑगस्ट क्रांतीदिनापासून भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळा सुरू होत असून केंद्र सरकारतर्फे संपूर्ण देशभर याचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानातंर्गत विभागीय आयुक्त कार्यालयात पंचप्रण शपथ घेण्यात आली.

यावेळी अपर आयुक्त निलेश सागर, उपायुक्त (सा.प्र.) रमेश काळे, उपायुक्त (रोहयो) प्रज्ञा बडे- मिसाळ, उपायुक्त (करमणूक कर) राणी ताटे, उपायुक्त (पुनर्वसन) मंजिरी मनोलकर, उपायुक्त (विकास) चंद्रकांत गुडेवार आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## माझी माती, माझा देश अभियान अंतर्गत विद्युत भवन येथे घेतली सामूहिक 'पंचप्रण शपथ'

**नाशिक । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीदांच्या स्मृतींना उजाळा देवून त्यांना वंदन करण्यासाठी 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन'या घोषवाक्यासह देशभरात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश'हे अभियान ९ ते २० ऑगस्ट २०२३ दरम्यान राबविण्यात येत आहे. त्या निमित्त महावितरणच्या नाशिक परिमंडल कार्यालयात विद्युत भवन येथे मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांच्या उपस्थितीत आज बुधवारी (०९ ऑगस्ट) रोजी महावितरणच्या अधिकारी व कर्मचारी यांना सामूहिकपणे पंचप्रण शपथ देण्यात आली.

याप्रसंगी अधिक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, सहाय्यक महाव्यवस्थापक लक्ष्मण वसावे, कार्यकारी अभियंता योगेश निकम, माणिकलाल तपासे, राजाराम डोंगरे व चेतन वाडे, उपमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले, प्रणाली विश्लेषक राजेंद्र सोनावणे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत चव्हाण, वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद फुलकर, विधी अधिकारी रणजीत बोम्मी, व्यवस्थापक सुदीप साळवे व मंगेश गाडे यांच्यासह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांनी माझी माती,माझा देश या अभियानाची उपस्थितांना माहिती देवून पंचप्रण शपथ चे वाचन केले.



## ११ व १२ ऑगस्ट रोजी रानभाजी महोत्सवाचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

रानभाज्यांचे आहारातील महत्व आणि दैनंदिन आहारात रानभाज्यांचा समावेश व्हावा यासाठी कृषि विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) नाशिक यांच्या वतीने जिल्ह्यात ११ व १२ ऑगस्ट २०२३ रोजी प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती) येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी महोत्सवास भेट देवून आरोग्यवर्धक रानभाज्या खरेदी कराव्यात, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे व आत्मा चे प्रकल्प संचालक राजेंद्र निकम यांनी केले आहे.

मानवी आरोग्यामध्ये सकस आहाराचे महत्व अनन्य साधारण आहे. जंगलात तसेच शेतशिवारात नैसर्गिकरित्या उगविल्या जाणाऱ्या रान पालेभाज्या, फळभाज्या, कंद, शेंगा यात शरीरास आवश्यक असणारे औषधी व पौष्टीक घटक विपूल प्रमाणात आढळतात. या रानभाज्यांचा हंगाम पावसाळ्याच्या सुरवातीपासून ऑक्टोबर पर्यंत चालतो. यात करवंदे, गुळवेल, कडूकंद, चाईचा मोहर आणि सुरण, तांदुळजा, काठेमाठ, कुडा, टाकळा, कोरला, कुर्डू, घोळ, अळू, खुरसणी, तोडली व लोथ यांचा समावेश होतो. रानभाज्यांची उगवण नैसर्गिकरित्या होत असल्यामुळे त्यावर रासायनिक किटकनाशके, बुरशीनाशके यांची फवारणी करण्यात येत नाही. त्यामुळे रानभाज्यांचे महत्व सर्वसामान्यापर्यंत जाण्यासाठी अशा महोत्सवाची व्याप्ती वाढविणे काळाची गरज असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

रानभाजी महोत्सवामुळे रानभाज्यांना चांगला बाजार मिळेल, शेतकऱ्यांना अशा भाज्यांचे योग्य भाव मिळतील व शहरी ग्राहकांना रानभाज्यांची ओळख होईल या दृष्टीकोनातून रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे व आत्मा चे प्रकल्प संचालक राजेंद्र निकम यांनी कळविले आहे.



## मतदार यादी सुसूत्रीकरण प्रशिक्षण संदर्भात पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन




**नाशिक । प्रतिनिधी**

वसंत स्मृती भाजपा कार्यालय येथे मतदार यादी सुसूत्रीकरण, प्रशिक्षण मतदार यादी सुसूत्रीकरण कार्यक्रम उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख तथा भाजपा पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद करून मतदार यादी सुसूत्रीकरणासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ पार पडला. या कार्यक्रमासाठी भाजपा महाराष्ट्र उपाध्यक्ष व नाशिक जिल्हा प्रभारी राजेंद्र गावित, आ. सीमा हिरे, नवनिर्वाचित जिल्हा अध्यक्ष प्रशांत जाधव (जिल्हाध्यक्ष नाशिक महानगर), सुनील बच्छाव (जिल्हाध्यक्ष नाशिक ग्रामीण दक्षिण), शंकर वाघ (जिल्हाध्यक्ष नाशिक दिंडोरी), सरचिटणीस जगन्नाथ पाटील, सरचिटणीस सुनील केदार, निमंत्रित सदस्य महेश हिरे, नाना शिलेदार व ज्येष्ठ भाजपा पदाधिकारी, तसेच नाशिक भाजपा मंडल अध्यक्ष, बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

ॲड. स्वप्नील सोंजे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

कि. दि. अर्ज कं. ९५५/२०२३

भाग्यश्री प्रविण पवार ....... अर्जदार
वि.
कोणीही नाही .......जाबदेणार
प्रविण भिकन पवार ...... मयत

ज्याअर्थी वरील अर्जदार मयत कै. प्रविण भिकन पवार यांचे वारस आहेत. मयत कै. प्रविण भिकन पवार यांचे दि. २६/०५/२०१३ रोजी निधन झाले, मयत कै. विजय सदाशिव गवांदे यांचे वारसांनी वारसदाखला मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं ८ साहेब धुळे यांचे कोर्टात कि. अर्ज नं. ९५५/२०२३ दाखल केलेला आहे.

तरी सदर बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक कायदेशीर तक्रार, हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ८ धुळे यांचे न्यायालयात दि.१२/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून वारस दाखला अर्जदाराच्या लाभात देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि.७/८/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन (शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कोर्ट नं. धुळे — दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर कोर्ट नं. धुळे

प्रोसेस जमा — ॲड. संदीप अर्जुन गर्दे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.७ वे ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात**

फौ. कि. अर्जः- ७३५/२०२३

कल्पनाबाई हिरामण खैरनार
उ. व. ५३ वर्ष धंदा : आशा वर्कर
रा.राम नगर,पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे ....अर्जदार
वि.
मा. निबंधक सो. जन्म मृत्यू नोंदणी /
ग्रामसेवक ग्रामपंचायत, पुरमेपाडा ता.जि.धुळे ....जाब देणार

ज्याअर्थी सतीष हिरामण खैरनार यांचा जन्म हा दि. ०४/१२/१९८६ रोजीची जन्मनोंद बाबत नोंदणी धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात अर्जदार कल्पनाबाई हिरामण खैरनार यांचा मुलाचा जन्माची नोंद होऊन सक्षम अधिकाऱ्याकडून जन्म दाखला मिळणेकामी अर्ज केला आहे. सदर अर्जचे तारीखकामी १६/०९/२०२३ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्ज बाबत जन्म नोंद होण्याबाबत तथा अर्जदारास जन्म नोंद प्रमाणपत्र मिळवण्याबाबत कोणाचीही काही हरकत असेल धुळे येथील मे. ७ वे ज्युडी, मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात हजर होऊन हरकत नोंदवावी. सदर दिवशी चौकशीकमी कोणीही हरकत न नोंदल्यास सदर अर्जाचा निकाल देण्यात येईल व अर्जदारास त्यांचे अर्जाचे दि. ०४/१२/१९८६ रोजी जन्म झाल्याची नोंद नोंदणीचा आदेश देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस आज ता. ०९/०८/२०२३ रोजी आमच्या सही व कोर्टाचा शिक्कानिशी दिली आहे.

धुळे
दिनांक : ०९/०८/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात — धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात

प्रोसेस जमा — ॲड. संदीप अर्जुन गर्दे
निशाणी नं.६

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.६ वे ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात**

फौ. कि. अर्जः- ७३४/२०२३

कल्पनाबाई हिरामण खैरनार
उ. व. ५३ वर्ष धंदा : आशा वर्कर
रा.राम नगर,पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे ....अर्जदार
वि.
मा. निबंधक सो. जन्म मृत्यू नोंदणी /
ग्रामसेवक ग्रामपंचायत, पुरमेपाडा ता.जि.धुळे ....जाब देणार

ज्याअर्थी कल्पना नामदेव वाघ यांचा जन्म हा दि. ०१/०६/१९६७ रोजीची जन्मनोंद बाबत नोंदणी धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात अर्जदार कल्पनाबाई हिरामण खैरनार यांचा मुलाचा जन्माची नोंद होऊन सक्षम अधिकाऱ्याकडून जन्म दाखला मिळणेकामी अर्ज केला आहे. सदर अर्जचे तारीखकामी ११/०९/२०२३ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्ज बाबत जन्म नोंद होण्याबाबत तथा अर्जदारास जन्म नोंद प्रमाणपत्र मिळवण्याबाबत कोणाचीही काही हरकत असेल धुळे येथील मे. ६ वे ज्युडी, मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात हजर होऊन हरकत नोंदवावी. सदर दिवशी चौकशीकमी कोणीही हरकत न नोंदल्यास सदर अर्जाचा निकाल देण्यात येईल व अर्जदारास त्यांचे अर्जाचे दि. ०१/०६/१९६७ रोजी जन्म झाल्याची नोंद नोंदणीचा आदेश देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस आज ता. ०८/०८/२०२३ रोजी आमच्या सही व कोर्टाचा शिक्कानिशी दिली आहे.

धुळे
दिनांक : ०९/०८/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात — धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात

## न्यूज कॉलम

### राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत धुळ्यातील खेळाडूंना चार सुवर्णपदके

**धुळे ।** संभाजीनगर येथे २९ ते ३१ जुलैदरम्यान झालेल्या राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत धुळे जिल्हा थाई बॉक्सिंग असोसिएशनतर्फे सहभागी झालेल्या खेळाडूंनी चार सुवर्ण, तीन रौप्य व तीन कांस्यपदकांची कमाई केली. राज्यस्तरीय स्पर्धेतील पदकप्राप्त खेळाडू असे सुवर्णपदक- प्रियदर्शनी अभय पाटील, प्रियंका अभय पाटील, इच्छिता आनंद गावडे, अवनी प्रसाद सराफ, रौप्यपदक- शिवराज दुष्यंत देशमुख, हरीसिद्धी युवराज गिरासे, सुमीत गजानन पाटील. कांस्यपदक- रिद्धी जितेंद्र बागल, अनुष्का अरविंद भदाणे, अमृत अरुण पाटील. हे सर्व खेळाडू जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचलित जयहिंद बालभवन संलग्न जयहिंद मार्शल आर्टस ॲकॅडमीचे खेळाडू आहेत.

### दारुच्या दुचाकींच्या धडकेत तरुण जखमी

**धुळे ।** भरधाव दुचाकीने दुसऱ्या दुचाकीला धडक देऊन झालेल्या अपघातात तरुण गंभीर जखमी झाला. मुंबई - आग्रा महामार्गावर सावळदे (ता. शिरपूर) येथील कृष्णा हॉटेलसमोर घडला. लक्ष्मीकांत मधुकर सूर्यवंशी असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्याच्या दुचाकी (एमएच १५, एएन ४९९७)ला मागील बाजूने संशयित दुचाकी (एमएच १८, सीए ३६२६) ने धडक दिली. अपघातानंतर दुचाकीस्वार पळून गेला.

# जिल्ह्यात 'मेरी माटी, मेरा देश' अभियानास बोराडी गावातून सुरवात





### जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते उध्दाटन संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन' या घोषवाक्यासह देशभरात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाचे उद्घटन आज शिरपुर तालुक्यातील बोराडी येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पवार, आमदार सर्वश्री अमरीशभाई पटेल, काशिराम पावरा, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गणेश मोरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, मेरी मिट्टी, मेरा देश अभियानाचे नोडल अधिकारी सचिन शिंदे, पंतप्रधान आत्मनिर्भर अभियान संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल रंधे, जिल्हा परिषद सदस्य जताबाई पावरा, सरपंच सुकदेव भील, माजी जिल्हा परिषद सदस्य सिमाताई रंधे, संस्थेचे सचिव निशांत रंधे, पंचायत समिती सदस्य सरिताबाई पावरा, सामाजिक कार्यकर्ते रमण पावरा, जयवंत पाडवी, माजी समाज कल्याण सभापती वसंत पावरा, विशाल पावरा, शिरपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे, सुवर्णा पवार, कृषी पंचायत समितीचे विभाग प्रमुख आर. एस. चौधरी, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी एस.एस.पवार, सुदाम मोरे, आर.जी.पावरा, ग्रामविकास अधिकारी डी.आर.पेंढारकर, शिक्षण विस्तार अधिकारी डी.पी.बुवा, तालुका अभियान व्यवस्थापक बचत गट विभाग रामचंद्र पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, बोराडी हे गाव क्रांतिवीरांचे असून या ठिकाणी स्वातंत्र्य काळातील अनेक घडामोडी होऊन गेल्या आहेत. जिल्ह्यात माझी माती, माझा देश अभियानाची सुरुवात बोराडी गावापासून होत असल्याने मला अत्यंत आनंद होत आहे. माझी माती, माझा देश उपक्रमांतर्गत ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यातील प्रत्येक गावात एक शिलाफलक उभारायचे असून या शिलाफलकावर त्या गावातील देशासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिक, हुतात्मा वीर, वीर जवानांचे नावाचा उल्लेख करावयाचा आहे. त्यानंतर राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रगीताचे गायन करावयाचे आहे. त्यानंतर याठिकाणी पंचप्रणची शपथ घ्यावयाची आहे. तसेच याठिकाणी ७५ वृक्षाची लहान 'अमृत वाटिका' तयार करायची आहे. मातीला व वीर सेनानींना वंदन करण्यासाठी हा शासनाने एक चांगला कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

बऱ्याच मुलांना आपल्या देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांची माहिती नसते. यासाठी मुलांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण होवून त्यांच्या मनात शहीद वीरांचा सन्मान होण्यासाठी शालेय अभ्यासक्रमांत तसेच शाळेच्या एखाद्या तासिकेच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्यातील शहीद झालेले वीर जवान, स्वातंत्र्य सैनिक, परमवीरचक्र, वीरचक्र विजेत्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे आवाहन शिक्षकांना यावेळी त्यांनी केले.

आमदार अमरीशभाई पटेल म्हणाले की, देशात माझी, माती माझा देश हा उपक्रम देशभर राबविण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी घेतला आहे. या उपक्रमानिमित्त जिल्हास्तरीय उपक्रम सुरू करण्याचा पहिला मान बोराडी ग्रामपंचायतीला मिळाला आहे. कारण या गावात क्रांतिवीर थोर स्वातंत्र्यसेनानी कर्मवीर व्यंकटराव रणधीर यांची ही भूमी आहे. बोराडी हे गाव क्रांतिवीरांचे असून या ठिकाणी स्वातंत्र्य काळातील अनेक घडामोडी होऊन गेल्या आहेत. आज आम्ही, माझ्यासह व्यासपीठावर बसलेले सर्वच जण कर्मवीरांची देणं आहोत. स्वातंत्र्य काळात कर्मवीर व्यंकटराव रणधीर यांनी आदिवासी भागात राहून वृक्ष लागवड, आदिवासी बांधवांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली होती. आज आदिवासी बांधव शिक्षणात अग्रेसर असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गुप्ता यांनी 'माझी माती, माझा देश' उपक्रमांची माहिती दिली. तसेच बोराडी गावात हा उपक्रम अतिशय चांगल्या प्रकारे राबविल्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्याचे आभार मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बोराडी गावातील ग्रामपंचायत हद्दीत शिलाफलक, वसुंधरा वंदन, जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा व क्रांतीविर ख्वाजा नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील थोर स्वातंत्र्यसैनिक कर्मवीर व्यंकटराव रंधे यांच्या शिलाफलकाचे अनावरण करण्यात आले. स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांना व वीरांना वंदन करून, पंचप्रण अर्थात शपथ घेण्यात आली. त्यासोबतच ध्वजारोहण उपक्रम राबविण्यात आला. यावेळी वसुंधा वंदनसाठी मुस्लिम कबरस्थानात ७५ वृक्षांचे वृक्षारोपण करणे, सर्वांनी पंच शपथ घेतली, माती कलशात भरून कलश पूजन करण्यात आले. यात थोर स्वातंत्र्य सेनानी कर्मवीर व्यंकटराव तानाजी रणधीर यांचे नातू माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सीमाताई रंधे, निशांत रंधे, राहुल रंधे, शशांक रंधे, रोहिणी रंधे यांना सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. त्याचबरोबर भिलाभाऊ कुवर यांचे नातू नंदकिशोर कुंवर, मनिषा कुंवर व भिकन भदाणे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा वर्कर, जिल्हा परिषदेचे शिक्षक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खंबाळे येथे क्रांती दिवस व आदिवासी गौरव दिवस साजरा



**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खंबाळे येथे आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांती दिवस व आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सर्व मान्यवर व प्राचार्य आर.एन.पवार यांनी आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा, तंट्या भिल यांचे प्रतिमेचे पूजन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंबाळे सरपंच सतीबाई आसाराम पावरा होते. प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते आसाराम पावरा, संजय कोळी (उपाध्यक्ष पालक शिक्षक संघ), संजय पावरा (ग्रा.पं.सदस्य, खंबाळे), प्राचार्य आर.एन.पवार उपस्थित होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त माझी माती माझी देश अंतर्गत पंचप्रण शपथ एम.जी.अहिरे यांनी सर्व उपस्थितांना व विद्यार्थ्यांना दिली. यावेळी देशभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. ३४ देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. लहान गट प्रथम क्रमांक खाटीक मायनूर अमीन, द्वितीय क्रमांक कोळी स्वप्नील दिनेश, तृतीय क्रमांक कोळी उन्नती संजय व हिवाळे मयुरी विलास. मोठा गट : प्रथम क्रमांक पावरा पवन रवींद्र व पाटील शिवानी सुनील, द्वितीय क्रमांक कोळी नंदिनी गोकुळ, तृतीय क्रमांक राजपूत साची राजेंद्र. त्यानंतर आदिवासी नृत्य सादर करण्यात आले. गावातील बहुसंख्य ग्रामस्थ तसेच पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेली आदिवासी नृत्य पाहून ग्रामस्थांनी भरभरून बक्षीसे देऊन कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.ए.पावरा यांनी तर आभार व्ही.एन.दोरीक यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्ही. एस.बेलदार, एस.डी.पाटील, आर यु. पवार, आर.एल.तवर, पी.बी. वाघ, ए.बी.महाजन, एस.आर. जाधव, एम.के.पावरा, रामचंद्र शिंदे, प्रकाश गुजराथी, चुनीलाल पावरा यांनी प्रयत्न केले.

## माझी माती, माझा देश अभियानातंर्गत लोकमान्य विद्यालयात 'पंचप्रण शपथ' सामुहिक वाचन



**धुळे ।** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी 'माझी माती, माझा देश ' उपक्रमाअंतर्गत लोकमान्य विद्यालयात 'पंचप्रण शपथ' चे सामुहिक वाचन करण्यात आले. यावेळी लोकमान्य माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# भडणे येथील भाविक अधिक मास निमित्त पंढरपुरात भागवत कथेसाठी रवाना

**चिमठाणे । प्रतिनिधी**



शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील भाविक अधिक मास महिन्यात जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर चे गोविंद महाराज वरसाडेकर यांच्या सुवाच्य वाणीतून आठ दिवस श्रीमद् भागवत कथेच्या आयोजन करण्यात आले आहे.

ही कथा पंढरपूर येथे महाप्रभू ची बैठकी जवळ भक्त पुंडलिक मंदिराच्या समोर शेगाव दुमाला तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी या कथेसाठी खानदेशातून जळगाव धुळे शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील भाविक सावन मास महिन्यात भागवत कथेच सेवन करणे अतिशय पवित्र मानले जाते आनंद घेण्यासाठी स्वतंत्र बस ने पंढरपूरला दाखल झाले आहेत. या आठ दिवस श्रीमद् भागवत कथेत काकड आरती भागवत सप्ताह तसेच कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यासाठी शिंदखेडा आगाराची स्वतंत्र बस वारकरी संप्रदायाचे तालुका अध्यक्ष व भडणे येथील माजी सरपंच पांडुरंग माळी तसेच महाजन हायस्कूलचे निवृत्त प्राचार्य एसटी चौधरी, विठोबा माऊली, पारोळ्याचे आप्पा माळी तसेच भाविकांना घेऊन स्वतंत्र बस भागवत कथेसाठी शिंदखेडा आगाराने सोडली होती. बस मधील सर्व भाविकांना विखरण जिल्हा परिषद गटाचे जि प सदस्य सत्यभामा धनंजय मगळे यांच्या वतीने पाणी बॉटल तसेच बिस्कीट पुडा वाटप करण्यात आले. यावेळी माझं हायस्कूलची सेवानिवृत्त प्राचार्य एसटी चौधरी यांनी बसचे पूजन करून बस पंढरपूरला रवाना झाली. सेवानिवृत्त प्राचार्य बी बी महाजन भाविक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. भागवत कथेची समाप्ती १३ ऑगस्ट रोजी असून भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# क्रांती दिन व विश्वआदिवासी दीनानिमित्त बाईक रॅली



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

९ ऑगस्ट क्रांती दिन व विश्वआदिवासी दीनानिमित्त बाईक रॅली काढण्यात सदर रॅली ही विविध गावांमध्ये जाऊन जनजागृतीपर काढण्यात आली.

सदर रॅली ही सडकपाडा, दहिवेल, चिंचपाडा, सामोडे, पिंपळनेर, शेंदवड, वार्सा, सुकापूर, बल्हाणे, पारगाव मांडाणे, धोंगडे यासह विविध गाव पड्यांवर १०० कि.मी पश्चिम पट्यात फिरून जनजागृती करण्यात आली. रॅलीत शेकडो तरुण सहभागी झाले होते. रॅलीचे आयोजन सर्व मिरून केले, डॉ. रंजन गावित,गणेश गावित, शरद देसाई, सुरेश अहिरे,संदीप चंदुलाल भोये,रणजित गवळी, रंजीत दादा, किरण पवार, राम ठाकरे, संतोष साबळे,संजू साबळे,सुनील चौरे,सुनील अहिरे,संतोष चौरे,गणेश बागुल,भजन कुवर, संदीप बच्छाव, प्रमोद माळी, हिम्मत बागुल, सुनील देसाई, संजय देसाई, रामचंद्र देसाई, काळु देसाई, नितीन गायकवाड यासह आबेक तरुण सामाजिक कार्यकर्ते व समाज बांधव कडून अकरा वाजताला रॅली सुरुवात करण्यात आली.

# भोंनगाव येथे मेरी मिट्टी मेरा देश अंतर्गत वृक्षारोपण



**दहिवेल । प्रतिनिधी**

उत्तमराव पाटील महाविद्यालय दहिवेल यांच्या रासेयो च्या वतीने आयोजित मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत भोंनगाव या दत्तक गावात पुरातन शिवमंदिर याठिकाणी ७५ रोप लावण्यात आली.

यावेळी संस्थेचे संचालक बाबासाहेब सत्यजित पाटील, भोंनगाव चे उपसरपंच मधुकर खैरनार, माजी सैनिक बोरसे, प्रा डॉ एस सी अहिरे, प्रा डॉ एस वाय गवळी, कार्यक्रम अधिकारी डॉ. योगेश कोरडे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा शिवप्रसाद शेवाळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ वंदना पाटील, प्रा डॉ एस एस भोई, प्रा डॉ अशोक मराठे, प्रा डॉ सुनील देसले, प्रा डॉ आर व्ही कारंडे, प्रा डॉ राजेंद्र अहिरराव, प्रा डॉ बी आर मोरे , प्रा डॉ एस ए पाटील, प्रा डॉ एस संदनशिव, विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# एनसीसीच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात विविध व्याख्यान व स्पर्धा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**



येथील जिल्हा क्रिडा संकुलात ४८ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात छात्रसैनिकांच्या शारिरीक, बौद्धिक व मानसिक विकास साधण्याकरीता विविध विषयावरील व्याख्याने व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

धुळे, जळगाव व नाशिक जिल्ह्यातील सहभागी छात्रसैनिकांसाठी सकाळी रिवेली नंतर योगा, ध्यान धारणा, बाधा प्रशिक्षण, शारिरीक सुदृढता अभ्यास, मैदानी प्रशिक्षणसह विविध विषयावर बौद्धिक व्याख्याने व स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. यात भुगोल व पर्यावरण अभ्यासक प्रो.डॉ. संजय घोडसे यांनी 'प्राकृतिक संसाधन संरक्षण व योग्य वापर' या विषयावर छात्रसैनिकांना मार्गदर्शन केले. क्रीडा संचालक डॉ. नरेश बागल यांनी 'नैतिकता व प्रेरणा' या विषयावर तर संरक्षण विषयाचे अभ्यासक प्रा.प्रशांत वानखेडे यांनी 'सैन्य संगठन व नोकरीच्या संधी' या विषयावर व्याख्यान दिले. तर सायबर तज्ञ पोलिस हवालदार दिलीप वसावे यांनी 'सायबर गुन्हे व सुरक्षा' या विषयावर व्याख्यान दिले.

छात्रसैनिकांमध्ये आरोग्य जाणिवा विकसित होणे आवश्यक असल्याने धुळे महानगर पालिकेतील आरोग्य अधिकारी डॉ. शुभम रजावत यांनी 'गृह परिचर्या व प्राथमिक उपचार' या विषयावर व्याख्यान दिले. याशिवाय सैन्य इतिहास व भुगोल, मानव संसाधन, राष्ट्र निर्माण, आपत्ती व्यवस्थापन, आत्मरक्षा, शरीर रचना व कार्य, सैन्य दलात अधिकारी कसे बनावे या शिवाय युध्दविद्या, शस्त्र विद्या, नकाशा वाचन व दिशा ज्ञान, शत्रूवर घात लावणे, फिल्ड सिग्नल व अंतर अंदाज या विषयावर तज्ञ व्यक्तिंचे व्याख्यान संपन्न झाले.

यासह शिबिरात वडेल रोडवरिल रेंजवर फायरिंग स्पर्धा, जिल्हा क्रीडा संकुलात ड्रिल स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा व जी- २०, नवी शिक्षानीती, आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष व महिला सशक्तिकरण या विषयावर 'फ्लैग एरिया' स्पर्धा संपन्न झाली. शिबिराच्या यशस्वीतेकरीता कंमाडिंग अधिकारी शैलेंद्रकुमार गुप्ता, एनसीसी अधिकारी मेजर डॉ. महेंद्रकुमार वाढे, लेफ्टनंट डॉ. क्रांति पाटील, सुभेदार मेजर सुभाष सिंग, सेंकड ऑफिसर श्याम पाटील, सेंकड ऑफिसर संदिप नांद्रे, थर्ड ऑफिसर विवेक बधान, सुभेदार इंदर कुमार, सुभेदार राजवीर, नायब सुभेदार रमेशकुमार, बीएचएम श्रीकांत वडार, हवालदार राजेद्र पवार, हवालदार लखविंदर सिंग, हवालदार जसपाल सिंग, हवालदार गुरनेकसिंग, हवालदार नवीनकुमार, सीटिओ वैशाली सुर्यवंशी हे परिश्रम घेत आहेत.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र






गुरुवार, दि. १० ऑगस्ट २०२३

# धुळेकर रसिकांना नाट्य परिषदेने दिली सांस्कृतिक मेजवानी






















धुळे । धुळेकर नागरिकांना नाट्य परिषदेने 'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' कार्यक्रमाचे संयोजन करत सांस्कृतिक मेजवानी दिली. तसेच या कार्यक्रमाला धुळेकरांनी देखील उत्तम प्रतिसाद दिला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शाहिरी काव्याच्या सादरीकरणाने धुळेनगरी दुमदुमली. गणरायाला नमन करून कलावंतांनी कार्यक्रमाला सुरुवात केली. मुंबई येथून आलेल्या दिग्गज कलावंतांनी अंगावर रोमांच आणणारे पोवाडे सादर केले. तसेच शाहीर अमर शेख यांचे नात्तू शाहीर निशांत शेख यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडं राहिली' ही छक्कड सादर करून उपस्थितांना ताल धरायला लावला. त्यांनी सादर केलेल्या पोवाड्याला रसिकांची भरभरून दाद मिळाली.

संकलन : दिपक वाघ



# महाराष्ट्राची लोकधारा परिसंवादासह सांगितिक संगीतमय कार्यक्रम
























धुळे । महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'महाराष्ट्राची लोकधारा शाहिरी परिसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शाहिरी काव्याच्या सादरीकरणाने धुळेनगरी दुमदुमली. गणरायाला नमन करून कलावंतांनी कार्यक्रमाला सुरुवात केली. मुंबई येथून आलेल्या दिग्गज कलावंतांनी अंगावर रोमांच आणणारे पोवाडे सादर केले. तसेच शाहीर अमर शेख यांचे नात्तू शाहीर निशांत शेख यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडं राहिली' ही छक्कड सादर करून उपस्थितांना ताल धरायला लावला. त्यांनी सादर केलेल्या पोवाड्याला रसिकांची भरभरून दाद मिळाली. याशिवाय कलावंतांनी लावणीनृत्य, लावणीगायन तसेच शाहीर साबळे यांची अजरामर गीते सादर करून वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे उदघाटन भारत सरकारच्या खेळ व युवा कार्यक्रम मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या नेहरू युवा केंद्र धुळे येथील जिल्हा युवा अधिकारी अशोककुमार मेघवाल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाटककार प्रा. अनिल सोनार होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मनोज गर्दे, युवा उद्योजक सारांश भावसार, लोकमंगल कलाविष्कार संस्थेचे अध्यक्ष विजय मंगळे, शाहीर श्रावण वाणी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य तथा जेष्ठ पत्रकार चंद्रशेखर पाटील यांनी केले होते. कार्यक्रमाची संकल्पना व संहिता प्रा. डॉ. प्रकाश खांडगे, चारुशीला साबळे वाच्छानी यांची होती. शाहीर निशांत शेख, शाहीर शंकर पिसाळ, नृत्यांगना वर्षा दर्पे, पूजा सावंत, शाहीर विजय कर्जावकर यांच्यासह लोककला क्षेत्रातील ३० मान्यवरांचा यात सहभाग होता. या कार्यक्रमासाठी नागरिकांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला होता.

संकलन : दिपक वाघ